# महिलांची इच्छाशक्ती प्रबळ असायला हवी–तृप्ती देसाई

साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com





**पिंपरी:–**प्रत्येक महिलेची इच्छाशक्ती प्रबळ असायला हवी, इच्छाशक्ती प्रबळ असल्यावर संपूर्ण जग जर तुमच्या विरोधात गेले तरी विजय तुमचाच असतो हे मी अनेक आंदोलनातून दाखवून दिले आहे. असे महिलांना उद्देशून भूमाता ब्रिगेड च्या संस्थापक अध्यक्ष तृप्ती देसाई यांनी सांगितले. जागतिक महिला दिनानिमित्त शबनम न्यूज मीडिया ग्रुप या वृत्त संस्थेच्या वतीने आदर्श नारी पुरस्कार २०२५ हा पुरस्कार सोहळा रविवारी १६ मार्च रोजी चिंचवड येथील सायन्स पार्क सभागृहात संपन्न झाला भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती ताई देसाई यांच्या शुभहस्ते समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना आदर्श नारी पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना गजाला सय्यद यांनी मांडली,या पुरस्कार सोहळ्यात चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या आमदार अश्विनी जगताप, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, अध्यक्ष सरिता अरुण साने, आदी मान्यवर उपस्थित होते.

अश्विनी जगताप (माजी आमदार )आमदार अश्विनी जगताप यांनी उषा माई ढोरे (माजी महापौर)माजी महापौर उषा माई ढोरे यांनी मार्गदर्शन केले

यावेळी पुरस्कार सोहळ्यात डॉ.तृप्ती रामाने–धनवटे(संचालक–आकांक्षा ऑर्गनायझेशन),सौ.अनितताई सुंदर कांबळे (संस्थापक अध्यक्षा:संविधान महिला मंडळ),सौ.संगीता ज्ञानेश्वर काळे (शिक्षिका,सातारा),सौ. सुप्रिया महेश चांदगुडे(संस्थापिका–आधार महिला मंडळ),सौ.पुनम संतोष म्हस्के (सामाजिककार्यकर्त्या),सौ.अश्विनी विशाल पवळ–सरोदे (आशा वर्कर ),सौ.प्रीती संजय मराठे (सामाजिक कार्यकर्त्या),सौ.सोनाली संदीप गाडे (सामाजिककार्यकर्त्या),सौ.अश्विनी बाळासाहेब घारे (अध्यक्ष एकता प्रतिष्ठान डोणे, मावळ),श्रीमती. मालन बबनराव घुले (वारकरी कीर्तनकार),सौ. मीना चंद्रमणी जावळे (आम आदमी पक्ष शहराध्यक्ष पिंपरी चिंचवड),श्रीमती कमल उत्तम सोनजे (कवयित्री लेखिका) या आदर्श महिलांना आदर्श नारी पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.तर पिंपरी चिंचवड शहरातील सामाजिक,शैक्षणिक,राजकीय व पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान या पुरस्कार सोहळ्याच्या निमित्ताने करण्यात आला.

यामध्ये सौ. अंजू कोंडीराम सोनवणे(सामाजिक कार्यकर्त्या),सौ. शोभा संभाजी पगारे(सामाजिक कार्यकर्त्या),सौ.कविता एकनाथ खराडे (संस्थापक- जिव्हाळा महिला विकास प्रतिष्ठान),सौ.पुनम विनयकुमार विश्वकर्मा(उद्योजिका),सौ.सुप्रिया सुनिल सोलांकुरे (सामाजिक कार्यकर्त्या),सौ.सायली कुलकर्णी (महिलापत्रकार),श्रीमती कुसुम रामचंद्र दळवी (वृत्तपत्र विक्रेत्या),सौअर्चना गजानन देशमुख (मेकअप आर्टिस्ट),सौ पुष्पा प्रदीप शेळके (राष्ट्रवादी शहर महिला संघटिका),सौ.माया सूर्यकांत मुळे (शिक्षिका) यांचा विशेष सन्मान करण्यात आला .तर उत्कृष्ट काम करणाऱ्या दहा महिला बचत गटांचा हि सन्मान करण्यात आलाया मध्ये सरस्वती महिला बचत गट, विघ्नहर्ता महिला बचत गट, राजमाता जिजाऊ महिला बचत गट,भिमाई महिला बचत गट, गृहलक्ष्मी महिला बचत गट, रिद्धी महिला बचत गट, सुवर्ण महिला बचत गट,श्रीमती धरूबाई महिला सोशल फाउंडेशन, वुमन पावर महिला बचत गट, रमाई महिला बचत गट या बचत गटांचा सन्मान करण्यात आला .

या पुरस्कार सोहळ्यात सामाजिक कार्यकर्ते संभाजी बारणे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्रसिंग वालिया,संजय मराठे यांच्यासह शेकडो महिलांनी या कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाच्या शेवटी आसिया इनामदार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक भाऊसाहेब कोकाटे यांनी केले.

# माजी आमदार विलास लांडे यांच्याकडून भंडारा डोंगर येथील मंदिर उभारणीसाठी १ कोटींची देणगी

## जीवनात प्रतिज्ञा महत्त्वाची : ज्ञानेश्वर महाराज कदम




साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**देहू:–**जीवनात काही साध्य करायचे असेल तर त्यासाठी प्रतिज्ञा करणे महत्त्वाचे आहे, असे सांगत ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली)यांचे बीजेनिमित्त कीर्तन झाले. संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी वैकुंठ गमन सोहळ्यानिमित्त श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे आयोजित गाथा पारायण आणि कीर्तन सप्ताहात बीजेच्या दिवशी त्यांचे कीर्तन झाले.

कीर्तनासाठी घोंटवीन लाळ ब्रम्हज्ञान्या हातीं।मुक्तं आत्मिस्थती सांडवीन ।।१।। हा अभंग घेतला.माजी आमदार विलास लांडे यांच्याकडून १ कोटींची देणगी भंडारा डोंगर येथे उभारण्यात येणाऱ्या मंदिराच्या कार्यासाठी सढळ हाताने मदत करावी,असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने तसेच माऊली कदम यांनीही केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत, माजी आमदार विलास लांडे यांनी एक कोटी रुपयांची देणगी भंडारा डोंगराला देऊ केली.यावेळी ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज कदम महाराज म्हणाले की, शांतीब्रह्म गुरुवर्य मारुती महाराज कुऱ्हेकर बाबांच्या आशीर्वादाने हा सोहळा सुरू झाला म्हणूनच हा सोहळा यशस्वी झाला. भंडारा डोंगरावर सुरू असलेल्या तुकाराम महाराज मंदिराच्या कामाला गती मिळावी म्हणून सोहळा भंडारा डोंगराच्या पायथ्याशी घेण्याची सूचना अमलात आणली. सुरुवातीला सर्वांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विशेषतः टाळकरी,भाकरी बनवून देणाऱ्या महिला, पोळ्या,मांडे बनवणाऱ्या महिलांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भंडारा डोंगर समितीला ही त्यांनी धन्यवाद दिले.श्री क्षेत्र भंडारा डोंगर येथे झालेल्या या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ज्ञानेश्वर महाराज कदम (छोटे माऊली) भंडारा डोंगर समितीचे प्रमुख बाळासाहेब काशिद उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की,मला मिळालेला पुरस्कार सर्व वारकरी धारकरी व लाडक्या बहिणींना समर्पित करतो. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, भंडारा डोंगर हा वारकऱ्यांच्या श्रद्धेचा विषय आहे. नद्या प्रदूषण रोखण्यासाठी लोक चळवळ निर्माण झाली पाहिजे.उपमुख्यमंत्र्यांकडे समोर मांडल्या मागण्या या कार्यक्रमास महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शांती ब्रह्म मारुती महाराज कुऱ्हेकर यांचे गुरुपूजन झाले. नंतर बाबांच्या हस्ते उपमुख्यमंत्र्यांचा सन्मान करण्यात आला. कदम माऊली यांनी वारकऱ्यांच्या वतीने इंद्रायणीच्या स्वच्छतेची मागणी केली. त्याचबरोबर प्रत्येक तालुक्याला वारकरी भवन व्हावे, वाखरीला मोकळ्या जागेत काँक्रीट व्हावे,भंडारा संस्थांनाला भोवतालची जागा जोडून द्यावी, वारकरी संप्रदायातील पद्मश्री पुरस्कार कुऱ्हेकर बाबांना मिळावा अशी मागणी केली.कदम महाराज म्हणाले की, धन्य म्हणून घेईन अशी प्रतिज्ञा अभंगात तुकाराम महाराजांनी केलेली आहे. जीवनात काही साध्य गाठायचे असेल तर जीवनात प्रतिज्ञा केली पाहिजे. तीन प्रकारच्या प्रतिज्ञा सांगितल्या आहेत. जीवप्रतिज्ञा, देवप्रतिज्ञा आणि संत प्रतिज्ञा. यातील जीवाची आणि देवाची प्रतिज्ञा कडेला जात नाही पण संतांची प्रतिज्ञा कडेला जाते.

उदाहरण म्हणून रामशास्त्री प्रभुणे यांनी केलेल्या प्रतिज्ञाचा दृष्टांत महाराजांनी सांगितला.अभंगाचे चिंतन सांगताना कदम माऊली म्हणाले की,जगद्गुरु तुकाराम महाराज असं म्हणतात की, मी लोकात असा कीर्तन भक्तीचा महिमा वाढविन आणि असे रस पूर्ण कीर्तन करीन की जे ऐकण्याकरता ब्रह्मज्ञान्याला देखील लाळ गोठण्यास लावीन. मुक्ताला आपली स्थितप्रज्ञ अवस्था टाकून देण्यास लावीन कारण कीर्तनाने शरीर देखील ब्रह्मरूप होते व भाग्य एवढे वाढते की देवासारखा ऋणी दास होतो.माऊली महाराजांनी सांगितले की, यज्ञ आणि दान साधनांना लाजवून सोडीन. भक्तीची जी शेवटची भाग्य मर्यादा आहे ती मर्यादा गाठून, त्या बळाने धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चारही पुरुषार्थ संपादन करीन आणि वेदात सांगितलेला जो जीवब्रह्मऐक्य रूप गुह्यार्थ त्याचेही ज्ञान करून घेईन. तुकाराम महाराज म्हणतात, इहलोकातील लोकांकडून मी धन्य म्हणवून घेईन व आमचे मोठे भाग्य म्हणून आम्ही या मृत्यूलोकात श्री तुकाराम महाराजांना डोळ्यांनी पाहिले असेही म्हणवून घेईन.कीर्तनाच्या उत्तरार्धात महाराजांनी वैकुंठ गमनाचा अभंग घेतला. आम्ही जातों तुम्ही कृपा असों द्यावी । सकळा सांगावी विनंती माझी ।।१।।संत तुकाराम महाराजांनी सनकादिकांना विनंती केली की तुम्ही देवाकडे माझी आठवण काढा. निरोप द्या आणि मला नेण्यासाठी मूळ पाठवा. नंतर गरुडाला विनंती केली की तुम्ही लवकर देवाला घेऊन या. लक्ष्मीला विनंती की तुम्ही देवाचे पाय सोडा. लक्ष्मी म्हणाल्या मी पाय सोडले पण देव योगनिद्रेत आहे मग शेषाला विनंती केली की तुम्ही देवाची योग निद्रा घालवा.शेष हलले देवाला जाग आली. देव तुकाराम भेटायला आले.चार युगातील भक्त देवासोबत होते. देवांनी सर्व नद्यांना इंद्रायणीत आणले. यमुना नर्मदा सरस्वती भागीरथी गंगा कृष्णा तुंगभद्रा इंद्रायणीस मिळाल्या. जगद्गुरु तुकोबाराय काळाच्या मस्तकावर पाय देऊन तुकोबा विमानात बसले. जगद्गुरु तुकोबारायांचा ३७५ वा वैकुंठ गमन सोहळा महाराजांनी कीर्तनातून सांगून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

# आमदार सुनील शेळके यांची आयुक्त योगेश म्हसे यांच्या समवेत विविध विकास कामांसाठी बैठक



**तळेगाव दाभाडे:–**मावळ तालुक्यातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी मावळचे आमदार सुनील शेळके यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण येथे आयुक्त योगेश म्हसे यांच्यासोबत बैठक घेतली. या बैठकीत मावळ तालुक्यातील पर्यटन विकास, क्रीडा संकुल,वाहतूक, नदी सुधार योजना आणि अन्य पायाभूत सुविधा विकासासंदर्भात चर्चा करण्यात आली.मावळ तालुका हा निसर्गरम्य स्थळांसाठी प्रसिद्ध असून,येथे मोठ्या प्रमाणावर पर्यटक येतात. त्यामुळे किल्ले तिकोना,तुंग,लोहगड आणि राजमाची या ऐतिहासिक किल्ल्यांपर्यंत जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांचे सुधारणा करण्यासाठी आणि पर्यटकांसाठी आवश्यक सोयीसुविधा उभारण्यासाठी पीएमआरडीएच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला.अद्ययावत क्रीडा संकुल उभारणार.

# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण आवार्डने प्रा.डॉ.चौडाप्पा डी.अणेकर सन्मानीत



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**सोलापूर–**आंबेडकर ग्लोबल फाऊंडेशन व इंडिया गॅलेक्सी फाउंडेशन नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र सदन येथे झालेल्या विशेष कार्यक्रमात प्रा.डॉ. चौडाप्पा डी अणेकर यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण आवार्ड २०२५ हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारामध्ये विशेष गौरव चिन्ह व प्रशस्तीपत्राचा समावेश आहे. प्रा.डॉ. चौडाप्पा डी अणेकर हे असिस्टंट प्रोफेसर म्हणून सी बी खेडगिज कॉलेज अक्कलकोट येथे मराठी विभागात कार्यरत आहेत.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा.ना. रामदासजी आठवले सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार हे उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी राज्यपाल डॉ. कमलताई गवई, खासदार बळवंत वानखेडे, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, माजी परराष्ट्रमंत्री मीनाक्षी लेखी, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग भारत सरकारच्या माजी सदस्या सौ.सुरेखाताई लांबतुरे यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक डॉ.मनीष गवई विशेष कार्यकारी अधिकारी हे उपस्थित होते.या कार्यक्रमाच्याप्रसंगी अशोक लांबतुरे ,मधुकर गवळी ,अलका गवळी, सचिन कांबळे , विजयेंद्र शिखरे आदि उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोशिएशनच्या उपाध्यक्षपदी वसंत कोकणे यांची निवड



साप्ताहिक प्रगत भारत
दररोजच्या ताज्या बातम्या व जाहिरातीसाठी पहा
pragatbharat.com

**पिंपरी:–** पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोशिएनच्या आज झालेल्या बैठकीमध्ये असोशिएशनचे अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनी वसंत कोकणे यांची उपाध्यक्षपदी निवड केली असल्याचे जाहीर केले. याप्रसंगी असोशिएशनचे सचिव राजू कोतवाल, खजिनदार संजय शिंदे, विजय कोतवाल आदी उपस्थित होते.यावेळी पिंपरी चिंचवड शहर क्रिकेट असोशिएशनच्यावतीने पिंपरी चिंचवड प्रिमिअर लिग स्पर्धेचे आयोजन करण्याचे ठरवले आहे. यासाठी पिंपरी चिंचवड परिसरातील सर्व क्रिकेट क्लबचे व्यवस्थापकांबरोबर सोमवार (दि.१७) सायंकाळी ६ वाजता हॉटेल मल्हार, प्राधिकरण, निगडी येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे.तरी सदर बैठकीस पिंपरी चिंचवड परिसरातील क्रिकेट क्लबच्या व्यवस्थापकांनी उपस्थित राहवे असे आवाहन अध्यक्ष जगदीश शेट्टी यांनी केले आहे.